**उलट तपास प्रतिवादी क्र. ५ ते ११ करीता ॲड. मांडवकर यांचे मार्फत शपथेवर सुरु :-**

हे म्हणणे खरे आहे की,दशरथ लोखंडे हे माझे आजोबा आहे. हे म्हणणे बरोबर आहे की, वडील महादेव हे दशरथ लोखंडे यांचा मुलगा आहे. आजोबाचे निधन केव्हा झाले हे मला माहित नाही. हे म्हणणे खरे आहे की,सुभद्रा कांबळे, शांती कांबळे व कौशल्या कांबळे या तिघी वडिलांच्या बहीणी आहेत व त्या तिघीही मयत आहेत.

हे म्हणणे खरे आहे की,गट क्र. १२ हे आजोबांचे मालकीची होती. वडील व बहिणींमध्ये मिळकतीचे वाटप झाले असे दर्शविणेकरीता माझे कडे कागदपत्रं नाहीत. वडिलांच्या बहिणीनी त्यांचा मिळकतीमधील हक्क सोडला असे दर्शविणेकरीता माझेकडे कोणतेही कागदपत्रं नाहीत. हे म्हणणे खरे आहे की,गट क्र.१२ चे आज मितीस दोन भाग गट क्र.१२/१ व १२/२ असे पडले आहे. हे म्हणणे खरे नाही की,दावा मिळकतीमध्ये वडिलांच्या तिनही बहिणींचा हिस्सा आहे. हे म्हणणे खरे आहे की,प्रतिवादी क्र. ५ ते ११ हे तीन बहिणींचे वारस आहेत. हे म्हणणे खरे नाही की,गट क्र. १२ वरील फेरफार नोंदी या बेकायदेशीर आहेत. हे म्हणणे खरे नाही की,खोटी साक्ष देत आहे.

**फेर तपास काही नाही.**

वा.दा.ब.अ.क.केले.
समक्ष,

(एस.व्ही. देशमुख)
दिवाणी न्यायाधीश,(क.स्तर),
उमरेड.
दि.३.८.१७

दि.दावा क.७३/१४ नि.क.  ४२ संजय वि आदेश व इतर

दि.दावा क.७३/१४
नि.क. ४२